दै. पुण्यनगरी दि. ०२/०७/२५

# 3 लाखांच्या गुटख्यासह कार जप्त

**देगलूर/ प्रतिनिधी**

राज्य शासनाने संपूर्ण राज्यात गुटखा बंदी घातली असताना देखील सीमावर्ती कर्नाटकातून गुटख्याची स्विफ्ट डिझायर कारमधून दुसऱ्या जिल्हयात वाहतूक होत असल्याची माहिती पोअ अबिनाशकुमार यांचे ऑपरेशन फ्लॅश आउट या मोहिमे अंतर्गत अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याबाबत देगलूर पोलीसांना मिळताच नांदेडकडे जाणारी संशयित कार वझरगा येथे अडवून सुमार ३ लाख २० हजारांचा गुटखा व ६ लाखाच्या कारसह २ आरोपी पोलीसांनी ताब्यात घेतले.

दि.३० जून रोजी सायंकाळी साडेसातच्या देगलूर पोलिसांना एका कारमधून गुटख्याची नांदेड जिल्ह्याबाहेर वाहतूक होत असल्याची गोपनीय सुत्राकडून माहिती मिळाली.अबिनाशकुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, देगलूर उपविभागीय अधिकारी संकेत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांनी त्वरित डीबी पथकातील कृष्णा तलवारे, वैजनाथ मोटरगे, राजवंतसिंग बुंगई, साहेबराव सगरोळीकर, रणजीत मुदिराज यांना कामाला लावले.देगलूरहून नांदेड मार्गे हिंगोलीकडे जाणारी संशयित स्विफ्ट डिझायर कार एम.एच १२ के एन ६०३९ चारचाकी



तपासणी केली असता त्यांना कारमध्ये सुगंधित पान मसाला, सुगंधित व्ही-१ बिग टोबॅको, रजनीगंधा पान मसाला, सिग्नेचर फायनेस्ट पानमसाला असा एकूण ३ लाख २० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. शेख साजिद बागवान(३८) व शेख अख्तर बागवान (३३) रा. सदर बाजार हिंगोली यांना गाडीसह ताब्यात घेतले. या आरोपीविरुद्ध देगलूर पोलीस ठाण्यात डीबी कर्मचारी राजवंतसिंघ बुंगई यांचे फिर्यादीवरून गुरनं ३४४/२०२५ दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक मारूती मुंडे करीत आहेत.